# फ्लिपकार्टने उत्सवाच्या काळासाठी आपल्या फर्निचर उत्पादनांमध्ये केली वृद्धी

- *निवड, विक्रेत्यांची संख्या आणि पिनकोडमध्ये वाढ करत देशभरातील ग्राहकांना परवडणाऱ्या दरातील आणि दर्जेदार फर्निचर उपलब्ध करून देणार*
- *सादर करत आहेत 'इंडिया का फर्निचर स्टुडिओ' मोहीम, देशभरातील ग्राहकांना परवडणाऱ्या दरात दर्जेदार फर्निचरची निवड करता यावी यासाठी साह्य करणार*

**बंगळुरु - १६ सप्टेंबर २०२० :** येत्या सणासुदीच्या काळात आणि बिग बिलियन डेजमध्ये ग्राहकांच्या आरामदायी जीवनातील विविध गरजा पूर्ण करण्यासाठी फ्लिपकार्ट या भारतातील एतद्देशीय ई-कॉमर्स बाजारपेठेने आज आपल्या फर्निचर व्यवसायाला बळकटी देणाऱ्या मोहिमेची घोषणा केली. या मोहिमेत उपलब्धता, परवडणारे दर, सुलभता आणि दर्जावर अधिक भर देत देशभरातील ग्राहकांना ऑनलाइन फर्निचरजी सहज उपलब्धता मिळावी यासाठी प्रयत्न केले जाणार आहेत. पहिल्यांदा ई-कॉमर्सचा वापर करणाऱ्या ग्राहकांसह अधिकाधिक ग्राहक इतर अनेक गरजांसोबतच घराच्या सजावटीसाठीच्या वस्तूंसाठी डिजिटल बाजारपेठेकडे वळत असल्याने हा उपक्रम सुयोग्य ठरतो.

कोविड-१९ संकटाने फर्निचरसह सर्व उत्पादन विभागांमध्ये मागणीच्या नव्या स्वरुपाला वाट करून दिली आहे. कारण आता आपण घरातच अधिक वेळ घालवतो. आता ग्राहक घरातील जागा अधिक आरामदायी करण्याच्या दृष्टीने अधिक गुंतवणूक करतात. त्यामुळे फर्निचर विभागात अर्गोनॉमिक फर्निचरची मागणी लक्षणीय प्रमाणात वाढली आहे. महानगरांमध्ये संकटपूर्व काळाच्या तुलनेत ही वाढ कित्येक टक्क्यांनी वाढली आहे. शिवाय द्वितीय आणि तृतीय श्रेणी बाजारपेठेतील ग्राहकही वाढत्या संख्येने लॉकडाऊनपासून फर्निचर खरेदी करत आहेत. आता उत्सवांचा काळ समीप येत असताना ग्राहकांना योग्य मूल्य देणाऱ्या फर्निचर खरेदीसाठी एक-थांबा पर्याय देण्याचे लक्ष्य फ्लिपकार्टने बाळगले आहे.

या प्रयत्नांचा भाग म्हणून फ्लिपकार्टने गेल्या वर्षीच्या तुलनेत विक्रेत्यांची संख्या जवळपास दुप्पट करत हा आकडा १०००० च्या पुढे नेला आहे. शिवाय, ग्राहकांच्या सतत बदलत जाणाऱ्या गरजांसाठी उत्पादनांमध्ये ३.५ लाखांहून अधिक पर्याय निवडीसाठी आहेत. त्यांनी विप्रो आणि फीदरलाईट यांसारख्या ब्रँडसह डब्ल्यूएफएच फर्निचर विक्रेत्यांची संख्याही ३० टक्क्यांहून अधिक वाढवली आहे. ग्राहकांना घरून काम करण्याच्या, शिक्षणाच्या गरजांसाठी हे फार उपयुक्त आहे. फ्लिपकार्ट पे लेटरसारख्या नव्या आणि सोयीस्कर पेमेंट पर्यायांच्या माध्यमातून फ्लिपकार्टने परवडणाऱ्या दरातील दर्जेदार फर्निचरची खरेदी ग्राहकांसाठी अधिक सहजसोपी केली आहे. त्यांनी आपल्या अत्याधुनिक पुरवठा साखळीच्या माध्यमातून देशभरातील सेवा देण्यायोग्य १०० टक्के पिनकोडपर्यंत आपली पोहोच वृद्धिंगत करत परवडणाऱ्या दरातील आणि दर्जेदार फर्निचर खरेदी करू इच्छिणाऱ्या ग्राहकांना साह्य केले आहे.

परवडणाऱ्या दरातील दर्जेदार फर्निचरच्या व्यापक यादीत योग्य निवड करण्यात देशभरातील ग्राहकांना साह्य करण्यासाठी त्यांनी 'इंडिया का फर्निचर स्टुडिओ' या मोहिमेचा शुभारंभ केला आहे. या मोहिमेत निवडीचे पर्याय सर्वांसाठी खुले करत ग्राहकांना ट्रेंडी डिझाइन्स सादर केल्या जातील. ग्राहकांच्या अनोख्या गरजा पूर्ण करणारी ही उत्पादने व्यापक प्रमाणात आणि योग्य मूल्यासहीत सादर करण्यात येत आहेत आणि ग्राहकांच्या सतत उत्क्रांत होणाऱ्या गरजांना अनुकुल अशी आहेत.

फ्लिपकार्टच्या बीजीएमएच, फर्निचर आणि ग्रोसरी विभागाचे वरिष्ठ उपाध्यक्ष मनिष कुमार म्हणाले, "*एतद्देशीय ई-कॉमर्स बाजारपेठ म्हणून आमच्या ग्राहकांच्या सतत उत्क्रांत होणाऱ्या गरजा परवडणाऱ्या दरातील बहुविध उत्पादने उपलब्ध करून देण्यासाठी फ्लिपकार्ट प्रयत्नशील आहे. त्यामुळे अत्यावश्यक फर्निचरच्या गरजा पूर्ण करण्यासाठी फ्लिपकार्ट हे ग्राहकांचे प्राधान्यक्रमाचे व्यासपीठ ठरले आहे. हजारो विक्रेत्यांचे व्यापक जाळे, लाखो उत्पादने आणि भारतभरातील पोहोच यामुळे येत्या काही वर्षात ई-कॉमर्सच्या प्रगतीत फर्निचर हा विभाग फार महत्त्वाची भूमिका बजावणार आहे. आमच्या ग्राहकांना अधिक चांगल्या प्रकारे साह्य करण्यासाठी आम्ही 'इंडिया का फर्निचर स्टुडिओ' ही मोहीम सुरू केली आहे. यात देशभरातील आमच्या आधीपासूनच्या आणि नव्या अशा लाखो ग्राहकांना या क्षेत्रातील सर्वोत्कृष्ट पर्याय मिळू शकतील. ऑनलाइन फर्निचर रिटेलिंगचे यश, विशेषत: कोविड काळातील, भारतातील ऑनलाइन व्यवसायासाठी महत्वाचा टप्पा आहे आणि यातून ई-कॉमर्सवर ग्राहकांचा विश्वास वाढत असल्याचे अधोरेखित झाले आहे.*"

सतत बदलणाऱ्या मागण्यांनुरुप फ्लिपकार्टही सातत्याने आपल्या उत्पादनांमध्ये नाविन्य आणत असते. देशभरातील हजारो विक्रेते आणि ब्रँडच्या साह्यामुळे त्यांना आपल्या ग्राहकांना व्यापक प्रमाणात दर्जेदार उत्पादने परवडणाऱ्या दरात देणे शक्य होते. मागील काही वर्षात, फ्लिपकार्टने आपल्या डिलिव्हरी आणि इन्स्टॉलेशन सेवांमध्ये लक्षणीय वाढ केल्याने ऑनलाइन फर्निचर रीटेलिंग देशाच्या दुर्गम भागांपर्यंतही पोहोचले आहे.

व्हिडीओची लिंक :
https://www.youtube.com/watch?v=AR43xQH191s

**About the Flipkart Group**

The Flipkart Group is one of India's leading digital commerce entities and includes group companies Flipkart, Myntra, and PhonePe. Started in 2007, Flipkart has enabled millions of consumers, sellers, merchants and small businesses to be a part of India's e-commerce revolution. With a registered customer base of over 200 million, offering over 150 million products across 80+ categories. Our efforts to democratize e-commerce in India, drive access and affordability, delight customers, create lakhs of jobs in the ecosystem and empower generations of entrepreneurs and MSMEs has driven us to innovate

on many industry firsts. Flipkart is known for pioneering services such as Cash on Delivery, No Cost EMI and easy returns – customer-centric innovations that have made online shopping more accessible and affordable for millions of Indians. Together with Myntra, which holds a prominent position in the online fashion market, and PhonePe, India's fastest growing digital payments platform, the Flipkart Group is steering the transformation of commerce in India through technology.

**For more details contact: media@flipkart.com**